# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. १५.१२.२०१५

**<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>**

# १६ व्या पार्ले महोत्सवाचे उद्‌घाटन सोहळ्यात महामहिम राज्यपाल यांची उपस्थिती

मुंबई : मुंबईसह महाराष्ट्रात आपल्या लोकप्रियतेची व्याप्ती वाढवणाऱ्या पार्ले महोत्सवाच्या सोळाव्या वर्षाचा उद्‌घाटन सोहळा महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल मा. श्री. विद्यासागर राव यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. यावेळी शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक मंत्री नामदार मा. श्री. विनोद तावडे, खासदार श्रीमती पूनम महाजन, प्रमुख आयोजक आमदार अॅड. पराग अळवणी तसेच पार्ले महोत्सवाचे ब्रॅण्ड अँबेसिडर प्रसिध्द अभिनेता स्वप्नील जोशी आणि त्यांच्या आगमी चित्रपट ''फ्रेंन्डस्'' चे सहकलाकार सचिन पाटील, गौरी नलावडे, नेहा महाजन हे या महोत्सवातील खेळाडू आणि स्पर्धकांचे मनोबल वाढविण्यासाठी आपली विशेष उपस्थिती दर्शवतील. रविवार दिनांक २० डिसेंबर २०१५ रोजी, सायंकाळी ५ वाजता, डुभाषी मैदानावर हा भव्य - दिव्य सोहळा रंगणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात १९ व्या कॉमनवेल्थ २०१० या स्पर्धेचे प्रतिनिधित्व केलेल्या वर्षा उपाध्याय यांच्या ''प्रिमियर ऱ्हिदमिक जिमनॅस्टिक'' ॲकॅडमीतर्फे भारतीय कलेतील योगा आणि मल्लखांब याचे सुरेख मिश्रण असलेल्या जिमनॅस्टिकच्या प्रदर्शनाने होणार आहे. दहा दिवस चालणाऱ्या या पार्ले महोत्सवात फक्त मुंबईच नव्हे तर महाराष्ट्रभरातील स्पर्धक सहभागी होतात. हजारो कार्यकर्ते दिवसरात्र हा सोहळा उत्तम होण्यासाठी मेहनत घेतात. त्यामुळेच प्रत्येक वर्षी या सोहळ्याची भव्य - दिव्यता वाढत आहे, अशी प्रतिक्रिया नगरसेविका ज्योती अळवणी यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे माध्यम प्रायोजक मुंबईचे नं. १ मराठी वृत्तपत्र  महाराष्ट्र टाइम्स असणार आहेत, तर झी २४ तास वृत्तवाहिनी टेलिव्हिजन पार्टनर आहे.

कार्यकर्त्यांनी मनापासून घेतलेली मेहनत आणि शिस्तबध्द नियोजन ही या सोहळ्याची ओळख आहे. त्यामुळेच स्पर्धक आणि त्यांच्या कलेला दाद देणाऱ्या दर्शकांची संख्यादेखील वाढत आहे. अशा या उत्साहाने भरलेल्या उत्सवात स्पर्धक म्हणून सामिल व्हा तसेच स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी व महोत्सवाचा आनंद लुटण्यासाठी प्रेक्षक म्हणून अवश्य या, असे आवाहन महोत्सवाचे ब्रॅण्ड ॲम्बॅसिडर स्वप्नील जोशी यांनी केले आहे. १६ व्या पार्ले महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी भाजपा कार्यालय, चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७ येथे किंवा २६१७७१२५/ २६१३६५१३ येथे संपर्क करावा. www.parlemahotsav.com व फेसबूक पेजवरही माहिती घेता येईल.

---

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.